# विद्यापीठ परीक्षांचा चेंडू अधिकार मंडळाच्या कोर्टात

## गजानन पळसे यांची माहिती : अधिकार मंडळाच्या बैठकीनंतर परीक्षेसंदर्भातील निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पदवी व पदव्युतरच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत घेण्यात येणार आहेत. लॉकडाऊनचा कालावधी वाढल्याने या परीक्षा कशा पध्दतीने घ्यायच्या याबाबत अधिकाऱ्यांची सोमवारी बैठक झाली.

एम. एस्सी. व दूरशिक्षणच्या परीक्षा कशा घेणार, परीक्षेला आलेले विद्यार्थी कुठे राहणार यासंदर्भातील कृती आराखडा २७ मे रोजी होणाऱ्या अधिकार मंडळाच्या बैठकीत मांडण्यात येणार आहे. राज्यशासन



व अधिकार मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच परीक्षा घेतल्या जातील, अशी महिती शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

लॉकडाऊन वाढल्याने बी. ए., बी. कॉम., बीएस. सी. सेमिस्टर सहा आणि एम. ए., एम. कॉम., एमएस. सी. सेमिस्टर चार, तसेच पाच वर्षाचा अभ्यासक्रम आर्कीटेक्चर आणि विधी (लॉ) सेमिस्टर दहाच्या परीक्षा कशा घ्यायच्या. १ जुलैपुर्वी विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टीकल, प्रात्यक्षिके किंवा तोंडी परीक्षा होणे अपेक्षीत आहे. दूरशिक्षणच्या परीक्षा कशा घ्यायच्या व काही अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सरासरी गुण कसे द्यायचे. यासंदर्भात बैठकीत चर्चा झाली.

२७ मे रोजी विद्यापीठ अधिकार मंडळाची बैठक होणार आहे. या बैठकीत अधिकार मंडळासमोर परीक्षेसंदर्भातील सर्व माहिती मांडण्यात येणार आहे. अधिकार मंडळाच्या अंतिम निर्णयानंतरच परीक्षेचे नियोजन केले जाईल, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

### आमच्या परीक्षा घेऊ नका

बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण मंत्र्यांसह शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना आमच्या परीक्षा घेऊ नका असे निवेदन दिले आहे. इतर वर्गाप्रमाणेच बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. तीनच्या विद्यार्थ्यांनी सरासरीनुसार गुण द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तरुण भारत
Tue, 19 May 2020
https://epaper.tarunbharat.com/c/52032169

# परीक्षा समितीचा अहवाल आठ दिवसांत

## परीक्षा घेण्याबाबत बैठकीत विचारविनिमय

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : विद्यापीठांतर्गत होणाऱ्या परीक्षांबाबतची माहिती महाविद्यालयांकडून मिळालेली आहे. याबाबतचा विस्तृत अहवाल बनवण्याचे काम सुरू आहे. पुढील आठ दिवसांत परीक्षा समिती अहवाल अधिकार मंडळाला देणार असून, त्यानंतर परीक्षेची तारीख आणि वेळापत्रक जाहीर होईल, असा निर्णय परीक्षा समितीच्या बैठकीत झाला. आज ऑनलाईन पद्धतीने ही बैठक झाली.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील सर्वच विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलल्या होत्या. त्यानंतर पदवीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाच्या परीक्षा रद्द केल्या. अभियांत्रिकी आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या वर्षाच्या परीक्षादेखील रद्द केल्या गेल्या. शेवटच्या वर्षाच्या परीक्षा मात्र होणार आहेत. या परीक्षा कधी आणि कशा पद्धतीने व्हाव्यात यासाठी विद्यापीठाने एक समिती नेमली. या समितीची तिसरी बैठक आज ऑनलाईन पद्धतीने झाली. समितीने सर्व महाविद्यालयांची माहिती संकलित केली आहे. यामध्ये पूर्ण झालेला अभ्यासक्रम, अंतर्गत परीक्षा याचा आढावा घेतला. या माहितीचा अहवाल बनवला जाणार आहे. युजीसीने दिलेल्या निर्देशानुसार परीक्षांचा आराखडा बनवण्याचे काम होईल. वेळापत्रकही ठरवण्यात येईल. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाला हा अहवाल सादर करण्यात येईल. पुढील आठ दिवसांत हा अहवाल सादर करण्याचे बैठकीत ठरवले.

बैठकीमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे, परीक्षा समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्यासह समिती सदस्य सहभागी झाले होते.

# पोंबरेच्या युवकाला कोरोनाची लागण

## विद्यापीठातील कक्षात विलगीकरण; पुण्यात करत होता स्पर्धा परीक्षेची तयारी



काळ वृत्तसेवा

बाजार भोगाव, ता. १८ : पुण्यात राहून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या पोंबरेपैकी चव्हाणवाडी (ता. पन्हाळा) येथील २५ वर्षीय युवकाला कोरोनाची लागण झाल्याचे आज स्पष्ट झाले. त्याला सीपीआरमध्ये दाखल केले आहे. दरम्यान, बाजार भोगाव परिसरात कोरोनाचा रुग्ण आढळल्याची अफवा आज दिवसभर सोशल मीडियावर फिरत होती.

### मी बरा होणार...

दरम्यान, संबंधित युवकाने आई व भावाशी संपर्क साधून मी सशक्त आहे. तुम्ही घाबरू नका. वैद्यकीय उपचारांनी नक्कीच कोरोनाला हरवेन, असा आत्मविश्वास व्यक्त केल्याचे त्याच्या जवळच्या नातेवाइकाने 'सकाळ'ला सांगितले.

दरम्यान, पोंबरेतून मिळालेल्या माहितीनुसार, हा युवक चार वर्षांपासून पुण्यात खासगी काम करत स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. काही परीक्षांमध्ये त्याने यशही मिळवले आहे. तथापि, मोठे यश मिळवूनच गावी परतण्याचा निर्धार त्याने केला होता. पण पुण्यातील कोरोनाच्या वाढत्या कहरामुळे व कुटुंबीयांच्या आग्रहास्तव तो १० मे रोजी कोल्हापुरात दाखल झाला. ११ मे रोजी सीपीआरमध्ये त्याचा स्वॅब घेऊन शिवाजी विद्यापीठात संस्थात्मक विलगीकरण केले. आज प्राप्त झालेल्या अहवालात तो पॉझिटिव्ह आढळला. आज त्याला उपचारार्थ सीपीआरच्या कक्षात दाखल केले आहे.

याआधी गणेशोत्सवावेळी तो गावी आला होता. त्यामुळे सध्या पोंबरेसह बाजार भोगाव परिसराला कंटेन्मेंट झोन घोषित करण्याची गरज नसल्याचे पन्हाळ्याचे तहसीलदार रमेश शेंडगे यांनी 'सकाळ'ला सांगितले.

दरम्यान, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ए. एस. कवठेकर यांनी बाजार भोगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे पथक पोंबरे येथे पाठवून संबंधित कुटुंबीयांकडून माहिती घेतली. सरपंच गणपती पाटील तसेच ग्राम कोरोना समितीशी सल्ला-मसलत करून करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

लोकमत

# महिनाअखेरपर्यंत ठरणार परीक्षेचे स्वरुप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक, लेखी परीक्षा घेण्याचे स्वरुप मे महिन्याच्या अखेरपर्यंत ठरणार असल्याचे सोमवारी स्पष्ट झाले. ते स्वरुप ठरविण्यासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेली १८ सदस्यीय समिती आठ दिवसांत त्याबाबतचा अहवाल देणार आहे. त्यावर अंतिम निर्णय विद्या परिषदेत होणार आहे.

या समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे आणि सदस्यांसह कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांची सोमवारी सकाळी साडेअकरा ते दुपारी अडीच यावेळेत ऑनलाईन बैठक झाली. त्यामध्ये अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक, लेखी परीक्षा, बॅकलॉग असणाऱ्यांची परीक्षा घेणे. त्यांना काही सवलती देणे. परीक्षा घेतल्यानंतर मूल्यमापन कसे करावयाचे, आदींबाबत सविस्तर चर्चा झाली. समितीची आणखी एक बैठक होईल. त्यानंतर समितीकडून परीक्षेचे स्वरुप ठरविण्यासाठीचा अहवाल आठ दिवसांमध्ये विद्यापीठाला सादर करण्यात येणार असल्याचे डॉ. कणसे यांनी सांगितले. डॉ. कामत यांनी परीक्षेच्या नियोजनाबाबतच्या प्रोटोकॉलची माहिती दिली. परीक्षेचे वेळापत्रक हे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून निश्चित केले जाणार आहे.

## दूरशिक्षण केंद्राकडून मागविली माहिती

राज्य शासनाच्या आदेशानुसार १ ते ३१ जुलैदरम्यान परीक्षा घेण्याचे नियोजन आहे. विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राचे काही विद्यार्थी हे कर्नाटक, गोवा राज्यांतील आहेत. त्यांच्यासह विद्यार्थ्यांची संख्या, त्यांच्या परीक्षा कोणत्या पद्धतीने घेता येतील, याचा अहवाल सादर करण्याची सूचना केंद्राच्या संचालकांना केल्या आहेत. समितीचा अहवाल विद्या परिषदेच्या बैठकीसमोर ठेवला जाणार आहे.



## परीक्षा अर्ज भरण्याबाबत कळविणार

उन्हाळी सत्र २०२० करिता विविध अभ्यासक्रमातील, सत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव परीक्षा अर्ज सादर केलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याकरिता विद्यापीठाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

पुढारी

# दूरशिक्षण विभागास परीक्षासंदर्भात आराखडा सादर करण्याच्या सूचना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागास परीक्षा घेण्यासंदर्भात आराखडा सादर करण्याच्या सूचना शैक्षणिक सत्र व वेळापत्रक निश्चितीसाठी नियुक्त समितीच्या बैठकीत देण्यात आल्या.

- विद्यापीठ नियुक्त समिती बैठकीत विविध विषयांवर चर्चा



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षांचे वेळापत्रक व अडचणीबाबत सोमवारी (दि. १८) विद्यापीठ नियुक्त समितीची कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाईन बैठक झाली. अंतिम सत्राच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षा कशा घ्यायच्या, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा यांचे नियोजन कसे करायचे यावर १८ सदस्यांनी मते मांडली. महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी व डॉ. आर. के. कामत यांनी तयार केलेल्या सॅनिटायझर प्रोटोकॉलबाबत चर्चा झाली.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, समिती अध्यक्ष डॉ. धनाजी कणसे यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

My Kolhapur Edition
19 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com